# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २३०-२२** **दिनांक २९/०७/२०२२**

## मोबाईल व रोख रक्कम जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०९/०७/२०२२ रोजी पहाटे ०३:०० वा वसई फाटा ब्रिज जवळ ता. वसई जि पालघर येथुन फिर्यादी हे सातीवली बालसंगोपन केंद्र येथे त्यांचे पत्नीस ॲडमिट करुन रिक्षा नसल्याने पायी चालत जात असतांना तीन अनोळखी इसमांनी दोन मोटार सायकलवर येवुन फिर्यादी यांना थांबवुन जबरदस्तीने त्यांचे जवळील मोबाईल व रोख रक्कम हिसकावुन मारहाण करुन पळुन गेले होते. सदर घटनेबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.५८४/२०२२ भां.द.वि.सं.कलम ३९४, ३४ प्रमाणे दिनांक ०९/०७/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील गुन्हयाची माहिती मिळताच लागलीच पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट दवेुन घटनास्थळावरील तांत्रिक माहितीचे आधारे आरोपीत यांचा माग काढुन आरोपीत १) फैजान गयासुद्दीन खान वय-१९ वर्षे, रा. मीरारोड, २) मोहम्मद आकीब मोहम्मद खलील खान वय-२२ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे ३) मैनुदिन इब्राहिम शेख वय-२० वर्षे, रा. मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्हयात जबरीने चोरी केलेला मोबाईल, रोख रक्कम व गुन्हा करण्याकरीता वापरलेली स्कुटी तसेच बजाज पल्सर असा एकुण १,३०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.